22 JUN 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठासमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आणि हिरवाईने नटलेला हा परिसर.

# हिरवाईने समृद्ध शिवाजी विद्यापीठ




शिवाजी विद्यापीठ म्हणजे हिरवाईने समृद्ध असणारा परिसर. विविध प्रकारच्या वृक्षराजीसह विविधरंगी फुले आणि फुलपाखरांसह मोरांचा अधिवास येथील परिसरामध्ये चैतन्य निर्माण करतो. विद्यापीठ परिसरातील हा सौंदर्य खजिना खास 'सकाळ'च्या वाचकांसाठी.

(सर्व छायाचित्रे : बी. डी. चेचर)



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरात फुललेली फुले.



येथे फुललेले कमळ.



वाऱ्यावर डोलणारे महाराष्ट्राचे राज्यपुष्प ताम्हण.



पिवळीधम्मक पीनट फ्लॉवरचा गालिचा.

22 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नियमित योग साधनेतून वैश्विक ऊर्जेची प्राप्ती

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात योगसाधना शिबिर

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : 'नियमित योग साधनेतून सूर्य, हवा, पाणी आणि सभोवतालच्या निसर्गामधून उत्सर्जीत होणारी वैश्विक ऊर्जा प्राप्त होते. योगामुळे उत्साह, आनंद आणि सुखाची अनुभूती होते', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष योगसाधना शिबिराचे आयोजन विद्यार्थी विकास, राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन व विस्तार कार्य विभागातर्फे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

आरोग्य संवर्धनासाठी योग ही भारताच्या प्राचीन परंपरेने दिलेली एक अमूल्य देणगी आहे. मन व शरीर, विचार व कृती, संयम व निसर्ग यांच्यातील ऐक्याला मूर्त रूप देतो. योगासने हा केवळ एक व्यायाम नाही, तर स्वत:शी, जगाशी आणि निसर्गाशी एकरूपतेची भावना शोधण्याचा मार्ग असल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठातील योगसाधना शिबिरामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी सहभागी झाले.

दरम्यान, आज विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सकाळी योगसाधना शिबिर झाले. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते रोपास पाणी वाहून या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, आदी सहभागी झाले. योगशिक्षक सूरज पाटील यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUN 2024
पुण्यनगरी



# योग साधनेतून ऊर्जा प्राप्त : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नियमित योग साधनेतून सूर्य, हवा, पाणी आणि सभोवतालच्या निसर्गामधून उत्सर्जित होणारी वैश्विक ऊर्जा प्राप्त होते. योगामुळे उत्साह, आनंद आणि सुखाची अनुभूती होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष योगसाधना शिबिराचे आयोजन विद्यार्थी विकास, राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन व विस्तार कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने केले होते. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, एनएसएसचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांची विशेष उपस्थिती होती. योगशिक्षक सूरज पाटील यांनी योगसाधनेचे प्रशिक्षण दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JUN 2024
सकाळ

# अन्न प्रक्रिया उद्योगाबाबत विद्यापीठात प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागातील इन्क्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग सेंटरला राज्य शासनाच्या कृषी विभागाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. या संस्थेतर्फे १९ ते २१ जून दरम्यान अन्न प्रक्रिया उद्योगातील नोंदणीकृत वैयक्तिक वीस लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आले.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी ऑडिटोरीयम हॉलमधील या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक बसवराज बिराजदार, जिल्हा कृषी अधिकारी अजय कुलकर्णी, जिल्हा नोडल अधिकारी आनंदराव जाधव, करवीरचे उपविभागीय कृषी अधिकारी अरुण भिंगारदिवे, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक गणेश गोडसे, करवीर तालुका अधिकारी बंडा कुंभार, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUN 2024
तरुण भारत

# प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत २० लाभार्थ्यांना प्रशिक्षण

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासन, कृषी विभागाकडून इन्क्युबेशन अॅण्ड ट्रेनिंग सेंटर, वनस्पतीशास्त्र अधिविभागास प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत क्षमता बांधणी व प्रशिक्षण घटकांतर्गत "जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था" म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. यातील नोंदणीकृत २० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी ऑडीटारीयम हॉलमध्ये प्रशिक्षण शिबिर पार पडले. प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. विभागीय कृषि सहसंचालक बसवराज बिराजदार, जिल्हा कृषि अधिकारी अजय कुलकर्णी, जिल्हा नोडल अधिकारी आनंदराव जाधव, उपविभागीय कृषि अधिकारी करवीर अरुण भिंगारदिवे, जिल्हा अग्रणी प्रबंधक गणेश गोडस, तालुका कृषि अधिकारी बंडा कुंभार, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. जे. पी. जाधव, आदी उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव यांनी कार्यक्रमांची माहिती दिली. कुलगुरु शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये सुरु असलेल्या संशोधन तसेच शेतकरी यांचेसाठी आवश्यक असलेल्या विविध घटकांची माहिती दिली. डॉ. जाधव यांनी अधिविभागामध्ये गुळावर सुरु असलेल्या संशोधनाबाबत माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष

22 JUN 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस.एन. सपली, प्रा. गणेश पाटील, प्रा. डॉ. एस.बी. चव्हाण, प्रा. अमर डुम, प्रा. प्रवीण सावंत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ५४ विद्यार्थ्यांची कंपन्यांमध्ये निवड

## शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांना मोठे पॅकेज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील ५४ विद्यार्थ्यांची निवड बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाचे विभागाकडून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

अधिविभागामध्ये विविध शाखांसाठी प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन केले जाते. २०२३-२०२४ यावर्षी विद्यार्थ्यांना हे यश मिळालेले आहे. तंत्रज्ञान अधिविभागाला कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के, प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले आहे. या यशामध्ये तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस.एन. सपली, विद्यापीठाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. राजन पडवळ, तंत्रज्ञान विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. गणेश पाटील, इलेक्ट्रॉनिक्स अँड. टेलिकम्युनिकेशन समन्वयक प्रा. डॉ. एस.बी. चव्हाण, प्रा. अमर डुम, प्रा. प्रवीण सावंत यांचे सहकार्य लाभले आहे.

**असे आहे पॅकेज :** एच.पी. एंटरप्राइजेस- ५ विद्यार्थी, पॅकेज ४.२ लाख, एलकॉम मरीन (मुंबई)- ३ विद्यार्थी, पॅकेज- ३.५ लाख, सायबर सक्सेस- ३ विद्यार्थी, पॅकेज-२ ते ४ लाख, एलकॉम इंटरनॅशनल- ४ विद्यार्थी, पॅकेज- ३ लाख, इन यंत्रा- ३४ विद्यार्थी- २ लाख, क्वॉलिटी किओस्क- २ विद्यार्थी, ४ लाख, किंग लाइफस्टाइल- १ विद्यार्थी, पॅकेज- ३.८ लाख, टेक्नॉलॉजीज (बंगळुरू)- १ विद्यार्थी, पॅकेज- २ लाख, बीव्हीजी ग्रुप- १ विद्यार्थी, पॅकेज- ३.८ लाख.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापु

22 JUN 2024 लोकसत्ता

# वर्षातून दोनदा प्रवेशांसाठी प्राधिकरणांची मान्यता हवी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सीयूईटी, शिक्षण मंडळ परीक्षा, प्रवेश परीक्षांतील गुणांआधारे प्रवेश दिला जाणार आहे . प्रवेशप्रक्रियेच्या पहिल्या सत्रात ज्या पद्धतीने प्रवेश होतात, तीच पद्धत दुसऱ्या सत्रात वापरण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे .**

**पुणे :** देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये वर्षातून दोन वेळा प्रवेशप्रक्रिया राबवण्यासाठी केंद्रीय विद्यापीठ प्रवेश परीक्षा पदवीपूर्व (सीयूईटी-यूजी), केंद्रीय विद्यापीठ प्रवेश परीक्षा पदव्युत्तर पदवी (सीयूईटी-पीजी) या परीक्षांचे गुण ग्राह्य धरता येतील. तसेच शिक्षण मंडळे, अन्य प्रवेश परीक्षांतील गुणांच्या आधारे प्रवेश देता येणार आहे. वर्षातून दोन वेळा प्रवेशासाठी इच्छुक उच्च शिक्षण संस्थांनी काळजीपूर्वक नियोजन करून प्राधिकरणांची मान्यता घेणे



आवश्यक आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. परदेशातील विद्यापीठांमध्ये वर्षातून दोन वेळा प्रवेश पद्धती अस्तित्वात आहे. मात्र, देशभरात पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका अशा अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया जुलै-ऑगस्टमध्ये वर्षातून एकदाच होते. त्यातून काही कारणांनी अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. या पार्श्वभूमीवर यूजीसीने ५८०व्या बैठकीत जून-जुलै आणि जानेवारी-फेब्रुवारी अशी वर्षातून दोन वेळा प्रवेशप्रक्रिया राबवण्यास मुभा देण्याचा निर्णय घेतला. मात्र, वर्षातून दोन वेळा प्रवेशप्रक्रिया राबवण्यासाठीची उच्च शिक्षण संस्थांची तयारी, पायाभूत सुविधा आवश्यक असल्याने दोन वेळा प्रवेश ऐच्छिक ठेवण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने प्रवेशप्रक्रिया, प्रवेशाचा निकष, दोन वेळा प्रवेशांना मान्यता, याबाबत अधिक स्पष्टता परिपत्रकाद्वारे देण्यात आली.